"लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची व्यक्तीगत मूल्ये आत्मविश्वास व सवयींचा तुलनात्मक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत शिक्षणशास्त्र विभागात विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवी करीता सादर करावयाचा संशोधन आराखडा

✷संशोधक✷

केंद्रे भगवान रामकृष्ण

(एम. ए. एम. एड्.)

✷ मार्गदर्शक ✷

प्रा. डॉ. श्री. लाहोरकर बालाजी रंगनाथराव

(एम. एस्सी., एम. एड्., सेट, पीएच. डी.)

सहयोग सेवाभावी संस्थेचे

इंदिरा अध्यापक महाविद्यालय (एम. एड्.) विष्णुपूरी, नांदेड

✷ संशोधन केंद्र ✷

शिक्षणशास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वर्ष - २०१७

१) प्रस्तावना :

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून जवळ-जवळ सात दशके पूर्ण झाली आहेत. या कालावधीत आपल्या देशाने शिक्षण, आरोग्य, कृषी, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवसाय, व्यापार, खेळ इत्यादी अनेक क्षेत्रामध्ये लक्षणिय प्रगती केलेली आहे. एकविसाव्या शतकामध्ये भारत देश हा एक जागतिक महासत्ता बनण्याच्या तयारीत आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचा आलेख पाहिला तर त्यामध्येही खुप प्रगती झालेल आपल्याला दिसून येईल. पुरुषांच्या साक्षरते बरोबरच महिलांचेही साक्षरतेचे प्रमाण वाढलेले आपल्याला जाणवेल. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आम्हीही काह कमी नाही याची जाणीव महिलांनी अनेक क्षेत्रांमध्ये सहभागी होवून व मोलाची कामगिरी करुन हे सिद्ध केले आहे.

जागतिक स्तरावर भारत देशाला एक मानाचे स्थान आहे. याला कारण आहे आपली संस्कृती आणि आपल्या परंपरा. यामुळेच भारत देश हा जगाच्या नकाशावर शोभून दिसतो यात शंकाच नाही.

हे सर्व पहात असताना समाजामध्ये खून, बलात्कार, जाळपोळ, लुटमार, बॉम्बस्फोट, चोऱ्या, धुम्रपान, गर्भपात, नशापान, अंधश्रद्धा या प्रकारच्याही घटना दैनंदिन जीवनामध्ये घडत असताना पाहायला मिळतात. आता मनामध्ये असा प्रश्न निर्माण होतो की, एकीकडे माणूस चंद्रावर जातो आहे, मंगळावर वस्ती करु पाहतो आहे. तर मग या घटना घडतातचं कशा? याला जबाबदार कोण? असे आपल्याला वाटल्याशिवाय राहणार नाही. आता कुठं गेली आपली संस्कृती? कुठे गेले आपले संस्कार? या बाबींचा शोध घेणे आपल्याला क्रमाप्रापत ठरते.

या सर्व गोष्टीचा जेंव्हा आपण सांगोपांग विचार करतो तेंव्हा आपणास असे दिसून येते की, विज्ञान व तंत्रज्ञानाचा चुकीच्या पद्धतीने झालेला वापर, माणसाची स्वार्थी वृत्ती,

पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा, धार्मिक संघर्ष, जातीय संघर्ष, भाषिक संघर्ष, प्रांतवाद इत्यादी कारणांमुळे या समाजविघातक घटना घडतात. यामध्ये सहभागी असलेली किंवा याला जबाबदार असलेली व्यक्ती कोण?याचा जेंव्हा आपण शोध घेतो तेंव्हा आपल्याला जाणवेल की, यामध्ये सुशिक्षित व तरुन पिढी गुंतली जात आहे. मग असे का? याचा जेंव्हा आपण विचार करतो तेंव्हा असे लक्षात येते की, कोणत्याही गोष्टीचे जसे फायदे असतात तसेच तोटेही असतात. आपण आपल्या घरामध्ये अनेक प्रकारच्या भौतिक सुविधांचा वापर करतो. त्यांचा मर्यादित वापर हा आपल्या फायद्याचा असतो आणि अतिरेकी यावर हा नुकसानदायक ठरतो. अनेक उच्च शिक्षित तरुणांकडून समाजविघातक कारवाया होताना आपण पाहतो. तेंव्हा आपल्याला असे दिसून येते की, या युवकांना लागलेल्या वाईट सवयी, वाईट लोकांची संगत, मूल्य संस्कारांचा अभाव, भौतिक साधनांचा चुकीचा व अतिरेकी वापर यामुळे ही पिढी वाईट गोष्टींकडे ओढल्या जात आहेत व अशा घटना घडताहेत.

तेंव्हा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवर होणारे संस्कार, त्यांना लागणाऱ्या बऱ्या-वाईट सवयी, त्यांच्यात होणारी मूल्यनिर्मिती, त्यांच्यात असणारा आत्मविश्वास यांचा अभ्यास करावा असे संशोधकाला वाटल्याने प्रस्तुत विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे.

२) समस्येची गरज :

मानवी जीवनात त्याच्या सकारात्मक दृष्टिकोनाला खुप महत्व आहे. जीवनात पावलो-पावली अनेक अडचणी, अनेक संकटे, अनेक आव्हानांना माणसांला सामोरे जावे लागते. तेंव्हा या सर्वांना धीराने सामोरे जाण्याचे धाडस जर माणसामध्ये असेल तर तो हे सर्व सहजपणे पार करु शकतो. अन्यथा माणूस कोलमडून जावू शकतो. कवी गुरु ठाकूर यांच्या शब्दांत सांगायचे झाल्यास-

“असे जगावे, छाताडावर आव्हानाचे लावून उत्तर

नजर रोखुनी नजरेमध्ये, आयुष्यात द्यावे उत्तर!”

एवढा आत्मविश्वास बाळगून जगण्याला जगण्याला एक प्रकारचे नैतिक बळ लागते ते महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मिळालेल्या संस्कारातून, शिकवणुकीतून, अंगी असलेल्या चांगल्या सवयींमधून प्राप्त होत असते.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारा कोणी दिशादर्शक भेटला तर त्याचे आयुष्य सुधारुन जाते. अन्यथा विद्यार्थी अनेक वाम मार्गाचा स्वीकार करतात.

म्हणून त्याच्या चारित्र्याचा योग्यरितीने विकास होण्यासाठी, त्याला योग्य मार्गदर्शनाची गरज असते. तेंव्हा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सवयी कोणकोणत्या, त्यांच्यामध्ये कोणकोणती व्यक्तिगत मूल्ये विकसित झाली आहेत, याचा शोध घ्यावा. तसेच त्याची आत्मविश्वासाची पातळी तपासून वेळोवेळी मार्गदर्शन केल्यास, योग्य प्रकारे जीवनाला दिशा दिल्यास उद्याचा एक उत्तम नागरिक तयार होतो. या सर्व बाबींचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत विषयावर संशोधन करणे गरजेचे वाटते.

३) संशोधन विषयाचे महत्व :

मानवाचा विकास हा शारीरिक, सामाजिक, बौद्धिक, भावनिक अशा अनेक अंगांनी होत असतो. हा विकास हा त्या-त्या क्षेत्रामध्ये अनुकूल वातावरण मिळण्यावर अवलंबून असतो. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे हे वय अतिशय नाजूक वळणावर येऊन ठेपलेले असते.

या काळात मिळणाऱ्या संस्कारावरच त्याचे पुढचे जीवन अवलंबून असते. त्यासाठी त्याची ही गरजपूर्ण होण्यासाठी त्याला सत्संगती, सद्विचारांचे संस्करण अपेक्षित असते. त्याच्या सवयीवर लक्ष ठेवावे लागते. त्याच्या अभ्यासविषयक सवयी कोणकोणत्या आहेत? अभ्यासेत्तर सवयी कोणकोणत्या आहेत? आधुनिक तंत्रज्ञानाचा तो कसा व किती वापर करतो? त्याचा त्याच्या कृतीशीलतेवर काय परिणाम झाला आहे? कोणत्या अंगाने त्याचा विकास होत आहे? कोणत्या क्षेत्राकडे त्याचा कल विकसित होत आहे? हे

ओळखून योग्य प्रकारे मार्गदर्शन केल्यास त्याचा फायदा होतो. तसेच त्याच्यात प्रचंड आत्मविश्वास निर्माण होतो. आत्मविश्वासाच्या बळावर तो अनेक यशस्वी शिखरे पादाक्रांत करु शकतो.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये या काळात अनेक व्यक्तिगत मूल्यांचाही विकास होत असतो. त्यामध्ये धार्मिक मूल्ये, सामाजिक मूल्ये, लोकशाहीवादी मूल्ये, सौंदर्यात्मक मूल्ये, आर्थिक मूल्ये, ज्ञानात्मक मूल्ये, विलासवादी मूल्ये, ऊर्जाविषयक मूल्ये, कौटूंबिक मूल्ये, आरोग्य विषयक मूल्ये इ. मूल्यांचा समावेश असू शकतो. या सर्व क्षेत्रांमध्ये योग्य वातावरण मिळाले, योग्य दिशा मिळाली, तर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व चांगल्या प्रकारे विकसित होऊ लागते, तो यशस्वीपणे जीवन जगू शकतो.

त्या-त्या टप्प्यांवर विद्यार्थ्याला अनुकूल वातावरण मिळवून देण्याच्या, योग्य मार्गदर्शन मिळवून देण्याच्या, अडीअडचणी समजून घेऊन योग्य सवयी लावण्याच्या, व्यक्तिगत मूल्यांचा विकास करुन आत्मविश्वास वाढीस लावण्याच्या दृष्टिने हे संशोधन उपयुक्त व महत्त्वाचे ठरणार आहे.

४) समस्या विधान :

''लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची व्यक्तिगत मूल्ये, आत्मविश्वास व सवयींचा तुलनात्मक अभ्यास''

५) कार्यात्मक व्याख्या :

१) लातूर जिल्हा :-

महाराष्ट्र राज्यात असलेल्या एकूण ३६ जिल्ह्यांपैकी मराठवाडा विभागात असलेला एक जिल्हा

२) महाविद्यालयीन विद्यार्थी :-

वयवर्ष १८ ते २४ या वयोगटातील पदवी व पदव्युत्तर महाविद्यालयात शिक्षण घेणारा तरुण.

३) व्यक्तिगत मूल्ये :-

व्यक्तिगत स्व ची सर्वांगीण व सम्यक जाणीव असण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मूल्यांना व्यक्तिगत मूल्ये म्हणतात.

४) आत्मविश्वास :

''माणसाने ठरविलेले अंतिम उद्दिष्ट साध्य होईपर्यंत जी अदृश्य शक्ती माणसाचे मन वळवते, त्यास प्रवृत्त करते आणि सतत मार्गदर्शन करत राहते, ती शक्ती म्हणजे आत्मविश्वास होय.''

मर्म यशाच्या सिद्धांताचे (२०१२) नेपोलियन हिल, जयको पब्लिशिंग हाऊस मुंबई.

६) सवयी :-

एखादी गोष्ट पुन्हा पुन्हा करण्याच्या मानवी प्रवृत्तीला सवयी म्हणतात.

६) गृहितके :

१) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अभ्यास सवयीबरोबरच अभ्यासेत्तर सवयी असतात.

२) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.

३) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून भारतीय संस्कृती व परंपरेची जपवणूक केलीजाते.

४) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक, धार्मिक, कौटूंबिक, आर्थिक व राजकीय विषयाबाबत स्वतःचे मत असते.

५) चांगल्या सवयी असणाऱ्या व नीतीमूल्यांचा विकास झालेल्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास उंचावलेला असतो.

७) संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी व अभ्यासेत्तर सवयींचा शोध घेणे.

२) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील व्यक्तिगत मूल्यांचा शोध घेणे.

३) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाची पातळी तपासणे.

४) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सवयी व व्यक्तिगत मूल्ये यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

५) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे आत्मविश्वासाच पातळी व सवयी यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

६) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची आत्मविश्वासाच पातळी व व्यक्तिगत मूल्ये यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

८) संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडशी संलग्न असलेल्या लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयाचा समावेश करण्यात आला आहे.

९) संशोधनाच्या मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे उपरोल्लेखित महाविद्यालयातील बी. ए. च्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित आहे.

१०) संशोधन पद्धती :

सदरहु संशोधन हे वर्तमानकालीन समस्येशी निगडीत असल्या कारणाने संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाच पातळी, विद्यार्थ्यांच्या सवयी व व्यक्तिगत मूल्ये यांच्या तुलनात्मक अभ्यास या समस्येचे योग्य मूल्यमापन सर्वेक्षण पद्धतीने होईल म्हणून ही संशोधन पद्धती निवडण्यात आली आहे.

११) संशोधनाची साधने :

१) Dr. (Mrs.) Vijaya Lakshmi & Dr. Shuti Narain यांची Adolescant's Habits Scale ही प्रमाणित कसोटी.

२) Dr. G. P. Sherry & Prof. R. P. Varma यांची Personal Values Questionanire ही प्रमाणित कसोटी.

३) Dr. Rekha Gupta यांची Self Confidence Inventory ही प्रमाणित कसोटी.

४) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली.

५) विविध प्रकारचे तक्ते, सारण्या, आलेख, सूत्रे इत्यादी.

१२) जनसंख्या व न्यादर्श :

लातूर जिल्ह्यातील पदवीचे शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयापैकी एकूण २० महाविद्यालयाचा यात समावेश केला आहे.

प्रत्येक महाविद्यालयातील २५ विद्यार्थी याप्रमाणे एकूण ५०० विद्यार्थ्यांचा या संशोधनात समावेश करण्यात येणार आहे.

महाविद्यालयातील विद्यार्थी नमुना निवडीसाठी सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धती वापरली जाईल.

१३) सांख्यिकीय परिमाण :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधक सांख्यिकीय परिमाणामध्ये केंद्रिय प्रवृत्तीची परिमाणे, शेकडेवारी, आलेख इत्यादीचा वापर करणार आहेत.

१४) कार्यवाहीचे टप्पे :

प्रथमतः संशोधन समस्येचा शोध घेऊन संशोधनाची गरज, महत्व, समस्या विधान, कार्यात्मक व्याख्या, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहितके, व्याप्ती, मर्यादांची मांडणी करणे त्यानंतर संबंधित साहित्याचा आढावा घेणे, संशोधनासाठी निवडलेल्या पद्धतीनुसार माहिती

संकलनाच्या साधनांची निर्मिती करणे व त्याद्वारे माहितीचे संकलन करणे, अर्थनिर्वचन, विश्लेषण करुन प्राप्त माहितीचे वर्गीकरण, तक्ते व आलेखाच्या सहाय्याने मांडणी करणे व शेवटी निष्कर्ष मांडणे, शिफारशी आणि पुढील संशोधनासाठी विषय सुचविणे याप्रमाणे कार्यवाहीचे टप्पे असतील.

१५) वेळापत्रक :

अ. क्र.	**संशोधन कार्य**	**कालावधी**	**महिने**
१	नोंदणी	जानेवारी / फेब्रुवारी २०१८	
२	संशोधनाचा अभ्यास	फेब्रुवारी १८ ते एप्रिल १८	३
३	संबंधित साहित्याचा व संशोधनाचा आढावा	मे २०१८ ते ऑक्टो. २०१८	६
४	प्रश्नावली विकसन	नोव्हेंबर २०१८ ते जाने. १८	३
५	माहिती संकलन करणे	फेब्रुवारी २०१९ ते जुलै १९	६
६	माहितीचे अर्थनिर्वचन	ऑगस्ट २०१९ ते जाने. २०	६
७	अहवाल लेखन	फेब्रुवारी २० ते जुलै २०	६
८	प्रबंध सादरीकरण	ऑगस्ट २० ते जाने. २१	६

संदर्भ सूची :

१) संशोधन पद्धती (१९९४) - य. च. म. मु. वि., नाशिक.

२) शिक्षणाचे मानसशास्त्रीय यथार्थदर्शन (१९९४) - य. च. म. मु. वि., नाशिक.

३) मूल्यशिक्षण (१२०११) - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

४) संशोधन : प्रदत्त संकलन आणि प्रयोग (२००२) - य. च. म. मु. वि., नाशिक.

५) मनोमापन व सांख्यिकी (२००२) - य. च. म. मु. वि., नाशिक.

६) मानसशास्त्रीय प्रयोग व चाचण्या (२००२) (कार्यपुस्तिका) - य. च. म. मु. विद्यापीठ, नाशिक.

७) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे - (१९९७) श्री. मुळे रा. शं. आणि श्री. उमाटे वि.तु. - महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळाकरिता, साहित्य प्रसार केंद्र, नागपूर.

८) शैक्षणिक संशोधन पद्धती (२००६) - वि. रा. भिंताडे - नित्यनुतन प्रकाशन, पुणे.

९) Psychological Test Catalouge (२०१७) N. P. C., Agra.

१०) श्री. बालाजी सखाजी पोटे (२००८) - यांचा संशोधन अहवाल - शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.

११) श्री. गौतम ज्ञा. लोंढे - (२००३) यांचा संशोधन अहवाल - शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.

१२) श्री. विश्वास रामचंद्र चव्हाण (२००९) - यांचा संशोधन अहवाल - शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

१३) यश तुमच्या हातात (२००२) - शिव खेरा मॅकमिलन पब्लिशर्स इंडिया लिमीटेड.

१४) निर्णय आणि जबाबदारी (२०१५) सरश्री - वॉव पब्लिशिंग प्रा. लि. पुणे.

१५) मर्म यशाच्या सिद्धांताचे (२०१२) - नेपोलियन हिल - जयको पब्लिशिंग हाऊस.

१६) Personal Values Questionnaire – D. G. P. Sherry (Agra), Dr. R. P. Varma (Varanasi).

१७) Adolescent's Habits Scale – Dr. Vijaya Lakshmi (Patna), Dr.Shruti Narain (Patna).

१८) Self Confidence Inventory – Dr. Rekha Gupta (Meerat)

१९) मुल्यांचे शिक्षण (१९९७) - शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

संशोधक

केंद्रे भगवान रामकृष्ण

मार्गदर्शक

प्रा.डॉ.लाहोरकर बालाजी रंगनाथराव

(एम. एस्सी., एम. एड्., सेट, पीएच. डी.)

सहयोग सेवाभावी संस्थेचे

इंदिरा अध्यापक महाविद्यालय (एम. एड्.) विष्णुपूरी, नांदेड